IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# प्राकृत नाट्य साहित्यातील स्त्री जीवन

**प्रा. विजया पंचाक्षरी गणमुखी**
अर्धमागधी विभाग
छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा.
घटक महाविद्यालय : कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*प्राकृत नाट्य*
*स्त्री जीवन*

**ABSTRACT**

प्राचीन काळापासून नाटक हे एक मनोरंजनाचे अत्यंत प्रभावी साधन म्हणून समाजात प्रिय झालेले होते. लोकांचे मनोरंजन करण्यासाठी प्रत्येक जाती-धर्माच्या भाषा साहित्यामध्ये कथाकथन गायन, नृत्य, विविध आवाजाची नक्कल किंवा हावभाव जाणून हालचालीच्या माध्यमातून एखादया विषयाचे स्पष्टीकरण करण्याची पद्धत प्राचीन काळापासून केले जात असलेले दिसून येते. यातूनच नाटकाची निर्मिती झालेली दिसून येते.

परंतु नाटयाचे प्रयोग हे राजदरबारापेक्षा किंया ग्रामीण भागातील लोकांचे मनोरंजन करण्यात यशस्वी होत असत. संस्कृत नाटकात प्राकृतमध्ये राजा, राणी बोलत असत. यातूनच प्राकृत साहित्य निर्माण होत गेले. समाजात प्राकृत भाषा बोलणारा वर्ग अधिक होता. त्यामुळे भास, भवभूती, कालिदास इत्यादी सर्व प्रसिद्ध नाटककारांनी आपल्या नाटय ग्रंथात केलेला दिसून येतो. इ.स. ९ व्या शतकात होऊन गेलेले संस्कृत, प्राकृत भाषा पंडित राजशेखर यांनी 'कर्पूरमंजरी' हे प्राकृत भाषेतील पहिले सट्टक लिहिले.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Ganmukhi, V. P. (2025). प्राकृत नाट्य साहित्यातील स्त्री जीवन. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(VI), 2592–2595.

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासून नाटक हे एक मनोरंजनाचे अत्यंत प्रभावी साधन म्हणून समाजात प्रिय झालेले होते. लोकांचे मनोरंजन करण्यासाठी प्रत्येक जाती-धर्माच्या भाषा साहित्यामध्ये कथाकथन गायन, नृत्य, विविध आवाजाची नक्कल किंवा हावभाव जाणून हालचालीच्या माध्यमातून एखादया विषयाचे स्पष्टीकरण करण्याची पद्धत प्राचीन काळापासून केले जात असलेले दिसून येते. यातूनच नाटकाची निर्मिती झालेली दिसून येते.

परंतु नाटयाचे प्रयोग हे राजदरबारापेक्षा किंया ग्रामीण भागातील लोकांचे मनोरंजन करण्यात यशस्वी होत असत. संस्कृत नाटकात प्राकृतमध्ये राजा, राणी बोलत असत. यातूनच प्राकृत साहित्य निर्माण होत गेले. समाजात प्राकृत भाषा बोलणारा वर्ग अधिक होता. त्यामुळे भास, भवभूती, कालिदास इत्यादी सर्व प्रसिद्ध नाटककारांनी आपल्या नाटय ग्रंथात केलेला दिसून येतो. इ.स. ९ व्या शतकात होऊन गेलेले संस्कृत, प्राकृत भाषा पंडित राजशेखर यांनी 'कर्पूरमंजरी' हे प्राकृत भाषेतील पहिले सट्टक लिहिले.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१)प्राकृत भाषेत्तील सट्टक साहित्याचा परिचय करून देणे.
२)प्राकृतातील सट्टके संस्कृत नाट्य साहित्यातून कशी भिन्न असतात ? ते स्पष्ट करणे.
३)प्राकृतातील सट्टके ही नायिका प्रधान, अदभूतता आणि चमत्कारास अधिक प्राधान्य देणारी कशी असतात ? ते स्पष्ट करणे.
४)सट्टक प्राकृत भाषेत लिहिण्याचा उद्देश स्पष्ट करणे.
५)चंद्रपाल राजा आणि कर्पूरमंजरी यांची विरह अवस्था प्रकट करणे.
६)भैरवानंदाच्या योगसामर्थ्याचे श्रेष्ठत्व स्पष्ट करणे.
७)स्त्रियांच्या श्रध्दाळूपणाचे प्रकटीकरण करणे.

**व्याप्ती :-**

प्रस्तुत विषयाची व्याप्ती 'कर्पूरमंजरी' या सट्टकाचे महत्व, उपयुक्तता स्पष्ट करण्यापूरतीच मर्यादित आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत विषयाची संशोधन पद्धती वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे.

**विषय विवेचन**

'कर्पूरमंजरी' हे प्राकृत साहित्यातील प्रथम सट्टक असून याची रचना राजशेखरांनी केली आहे. या सट्टकामध्ये चंद्रपाल राजा व कुंतल देशाची राजकन्या कर्पूरमंजरी यांच्या प्रेमाची कथा चार अंकात विभागलेली आहे.

**सट्टककार राजशेखराचा परिचय**

कवी राजशेखर हे ब्राह्मण कुळात जन्मलेले होते. त्यांच्या कुळात विद्वता परंपरा होती. अकालजलद या राजशेखरांच्या आजोबांना, 'महाराष्ट्र चुडामणी' ही पदवी मिळाली होती.

कवी राजशेखरांनी चव्हाण राजकुळातील अवंती सुंदरीशी प्रेमविवाह केलेला होता. तिच्या आग्रहामुळेच राजशेखरांनी कर्पूरमंजरी हे सट्टक लिहिले. कुंतल देशाविषयी कवीच्या मनात अधिक आदर असल्याने कुंतल देशाच्या राजाची कन्या कर्पूरमंजरी नायिका म्हणून आपल्या सट्टकासाठी निवडलेली दिसून येते.

**कर्पूरमंजरी सट्टक**

कवी राजशेखराचे कर्पूरमंजरी सट्टक हे प्राकृत नाट्य साहित्यातील पहिले सट्टक होय. यामध्ये चंद्रपाल राजा, कर्पूरमंजरी यांच्या प्रेमाचे कथानक चार अंकात विभागलेले आहेत.

१) पहिला अंक

राजा चंद्रकांत, राणी विभ्रमलेखा, विदूषक आणि विचक्षणा दासी उद्यानात येतात. वसंतऋतु आणि मलय पर्वतावरून

येणा-या वा-याचे वर्णन करतात. तेथे एक भैरवानंद नावाचा योगी असतो. तो अचानकपणे येऊन स्वतःच्या शक्तीचे वर्णन करतो. त्यावेळी माझ्याकडून तुम्हास काय अपेक्षित आहे ? असे विचारतो. तेव्हा विदूषकाच्या सांगण्यावरून भैरवानंद योगी आपल्या योग सामर्थ्याने कुंतल राजाच्या कर्पूरमंजरीला उद्यानात हजर करतो. कर्पूरमंजिरीच्याही मनामध्ये चंद्रपालराजा विषयी प्रेमभाव निर्माण होतात. इत्यादी घटनांचे वर्णन प्रथम अंकामध्ये आहे. त्यानंतर राणी तिची चौकशी करते. तेव्हा कर्पूरमंजरी म्हणते, "मी दक्षिण पंथातील कुंतल देशाच्या वल्लभ राजाच्या शशी प्रिया राणीची कन्या आहे. ते ऐकून विभ्रमलेखा राणी ही माझी मावशी आहे. याचा अर्थ असा की कर्पूरमंजरी ही माझी मावास बहीण आहे. भैरवानंदाच्या कृपेने माझ्या बहिणीची भेट झाली आहे. तेव्हा ही माझ्याकडे पाच दहा दिवस राहू दया. नंतर ध्यानयोगाच्या सहाय्याने तिला तिच्या घरी पाठवा, असे म्हणून राणी दासीकडून भैरवानंदाचा योग्य सन्मान करते. अशाप्रकारे विभ्रमलेखाराणी कडून कर्पूरमंजरीचे योग्य प्रकारे स्वागत केले जाते.

२) दुसरा अंक

दुस-या अंकामध्ये कर्पूरमंजरीच्या सौंदर्याने, तारुण्याने मोहित झालेला राजा तिचाच विचार करतो. इकडे कर्पूरमंजरीचीही तशीच अवस्था होते. तेव्हा या दोन प्रेमिकांची भेट होण्यासाठी विदूषक व विचक्षणा दासी कसा प्रयत्न करतात ? हे या अंकात आलेले दिसून येते.

चंदपाल राजा हा कर्पूरमंजरीच्या सौदर्याने वर्णन करण्यात मग्न होतो. इकडे चंद्रपाल राजाच्या प्रेमात पडलेली कर्पूरमंजरी ही विरहाने व्याकूळ होऊन राजाची भेट घेण्यास आतुरलेली असते. परंतु विभ्रमलेखा राणीच्या भीतीने कर्पूरमंजरी चंद्रपाल राजास भेटू शकत नाही. त्यामुळे आपली होणारी विरहाची व्यथा केवड्याच्या पानावर लिहून विचक्षणादासी मार्फत चंद्रपालकडे पाठवून देते. तुझ्या मैत्रिणीने हे पत्र दिलेले आहे. असे सांगून विदुषक कर्पूरमंजरीने दिलेले पत्र राजाच्या हातात देतो. परंतु या दोघा प्रेमिकांची भेट घडवून आणण्यासाठी विदूषक व विचक्षणा प्रयत्नशील असतात. योगायोगाने तशी संधी येते. हिंदोळा चतुर्थीच्या दिवशी विभ्रमलेखाराणी मरकत उद्यानातील पार्वती देवीच्या मंदिरात हिंदोळा सादर करणार आहे. तेव्हा तेथे महाराजांनी यावे व कर्पूरमंजरीची भेट घ्यावी असा निरोप पाठविल्याचे विदुषक सांगतो. त्यावेळी राजा तेथे येतो.

**३) तिसरा अंक**

तिस-या अंकामध्ये चंद्रपाल राजास आपल्या कर्पूरमंजरी प्रेयसीची भेट घेता न आल्याने तो स्वप्नांचा आधार घेऊन आपले जीवन कसे कंठत असतो? याचे वर्णन येथे आलेले आहे.

विदुषकास एक स्वप्न पडलेले होते. स्वप्नात एक सुंदरी आलेली होती. हे ऐकून विदूषक राजास म्हणतो की मलाही एक स्वप्न पडले होते असे म्हणून दोघेही प्रेमाविषयी चर्चा करतात.

**४) चौथा अंक**

या अंकात कर्पूरमंजरी व चंद्रपाल राजा यांच्या प्रेमात वाढ होत जाऊन त्याचे रूपांतर विवाहात झालेले दिसून येते.

कर्पूरमंजरीच्या विरहाने व्याकुळ झालेला राजा हा विदूषक आणि दासीच्या मदतीने भुयारी मार्गाने कर्पूरमंजरीस भेटत राहतो. परंतु ही बातमी जेव्हा राणीला समजते. तेव्हा तेथील राणी भुयारी मार्ग बंद करतेच. एवढेच नव्हे तर चारी बाजूला शस्त्रधारी, धनुष्यबाणधारी सेविकांची नेमणूक करते. त्यामुळे राजा आणि कर्पूरमंजरी यांना परस्पर भेटणे कठीण होते.

एके दिवशी राणीचा निरोप येतो की वटसावित्री व्रताचा सोहळा राणीकडून साजरा केला जाणार आहे. त्या निरोपास मान देऊन राजा, भैरवानंद आणि विदूषक इत्यादी सर्व सोहळा पाहण्यासाठी गच्छीवर जाऊन बसतात.

तेव्हा विविध प्रकारचे अलंकार, वस्त्र परिधान केलेल्या तरुण नर्तिका विविध प्रकारचे नृत्य करू लागतात. काहींनी मोरपिसे लावून व भिल्ल वेष परिधान करून काही स्त्रिया वाद्य वाजवीत होत्या. हा उत्सव पाहून लोक आनंदीत झाले होते.

विभ्रमलेखा राणीकडून वटसावित्रीचा उत्सव साजरा केल्यानंतर चामुंडा देवी पार्वतीच्या मूर्तीची भैरवानंदाच्या हस्ते प्रतिष्ठापना करण्याचे ठरविते. गुरुदक्षिणा मागितली जाते. त्यावेळी भैरवानंद म्हणतो की लाट देशाच्या चंद्रसेन राजाच्या घनसागरमंजरी मुलीशी राजाचा विवाह करून द्यावा कारण घनसागर म्हणजे ज्याचा विवाह होईल तो राजा चक्रवर्ती होईल अशी भविष्यवाणी आहे. तेव्हा राणी तयार होते. राणी आपण स्वतःहून विवाहाची सामुग्री आणते व विदूषकाच्या मार्फत विवाह सोहळा पूर्ण केला जातो. त्यावेळी विदूषक कर्पूरमंजरीचे दुसरे नाव घनसागरमंजरी असे ठेवतो. अशाप्रकारे चक्रवर्ती पद आपल्या पतीस मिळावे म्हणून विभ्रमलेखा राणी स्वतः चंद्रपाल राजा आणि कर्पूरमंजरी यांचा विवाह करून देते.

निष्कर्ष

पहिल्या अंकात चंद्रपाल राजा आणि आणि कर्पूरमंजरी यांची भेट गैरवानंद योगी घडवून आणतो. यामध्ये विचक्षणादासीचे बुद्धी चातुर्याचे श्रेष्ठत्व स्पष्ट केलेले दिसून येते. दुस-या अंकात कर्पूरमंजरी ही पत्र लिहून राजाच्या प्रेमात अनुकूलता दर्शविते. तिस-या अंकात विदूषक आणि विचक्षणा दासीच्या प्रयत्नाने या दोन प्रेमिकांची भेट घडते. चौथ्या अंकात विभ्रमलेखा राणी धार्मिक आणि श्रद्धाळू असल्याने धार्मिक उत्सव मोठ्या उत्साहाने करते. शिवाय आपल्या पतीला राजाधीराज ही पदवी

मिळणार असेल तर स्वतःचे दुःख बाजूला सारून आपल्या पतीचा विवाह दुस-या स्त्रीशी लावून देऊन राणीच्या मनाचा मोठेपणा येथे दिसून येतो.

संदर्भ ग्रंथ

१) कर्पूरमंजरी लेखक - प्रा. हातवळणे मो. दि., चित्रकला प्रकाशन, पुणे १९६०
२) प्राकृत एवं जैनागम साहित्य लेखक - डॉ. हरिशंकर पाण्डेय श्री. लक्ष्मी पब्लिकेशन कतिरा, आरा २०००
३) संस्कृत साहित्याचा इतिहास भाग-५ दशरूपके, लेखक - डॉ. सुरुचि पांडे २००३ पुणे ३०
४) प्राकृत साहित्याचा इतिहास - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर २००९
५) विकिपीडिया